# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०१/२०२५ (सोमवार) दुपार

---

### पो.स्टे. कोंढाळी हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १२/०१/२०२५ रोजी पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील बाजारगाव येथे काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी बाजारगाव येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) सेवाराम किशनराम डोकीया वय ५० वर्ष रा बाजारगाव २) सुधाकर मोतीराम ढोणे वय ४५ वर्ष रा देवळी, ३) जसलाल सावलाल गौतम वय ३६ वर्ष ४) गोपाल चिरकुटराव येडमे, वय २७ वर्ष, ५) स्वप्नील अरून मडावी वय ३१ वर्ष ६) अंकुश लक्ष्मण गजभीये यय ३३ वर्ष चारही रा बाजारगाव, आणी फरार आरोपी क्र. ७) मनोज वनकर रा धामणा ता हिंगणा ८) राहूल वानुसाजी शेंडे रा बाजारगाव** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०६ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) नगदी ९६५०/— रू व १ बुलेट क्र. एम एच ४०/बी.पी.५५७७ किंमती १,००,०००/— रु. २) सिटी १०० मोसा क्र. एम एच ४० बी.एम. ७६५३ किंमती ३०,०००/— रु. ३) मेस्ट्रो स्कुटी क्र. एम एच ४० ए व्ही.—५३२१ किमती ३०,००० रू. ४) बुलेट गाडी क्र. एम एच ४९ एस.५८४३ किंमती १,००,००० रु. ॲक्टीव्हा गाडी क्र एम एच ४०.बी. एच २१८३ किंमती ३०,००० रू असा एकुण २,९९,६५० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कोंढाळी येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन उमरेड**:—दिनांक १२/०१/२५ रोजी २१:०० ते २२:०० वाजतादराम्यान उमरेड पोलीस, हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भिवापुर रोड ठाणा ते उमरेड रोड येथे नाकाबंदी केली असता संशयीत ट्रक क्रमांक एम.एच ४० सी एफ ५६९१ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे पवन अशोक पाथोडे,वय २६ वर्षे, पत्ता. बोथली,ता नागभिड जि चंद्रपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.तसेच रेतीची वाहतुक प्रज्वल वासुदेव वानखेडे, रा. बहादुरा नागपूर यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती आणि २) ट्रक क्रमांक एम.एच ४० सी एफ ५६९१ असा एकुण २०,२५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

ट्रक चालक आरोपी नामे पवन अशोक पाथोडे , वय २६ वर्षे, पत्ता. बोथली,ता नागभिड जि चंद्रपुर आणि आरोपी प्रज्वल वासुदेव वानखेडे, रा. बहादुरा नागपूर याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.गुन्हयाचा पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**